# लोकप्रशासन विषयाच्या संदर्भग्रंथाचे प्रकाशन

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार आणि सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर येथील डॉ. ऊर्मीला रेडी आणि डॉ. दत्तात्रय खरटमोल संपादित 'भारतातील लोकप्रशासनाचा विकास' या संदर्भ ग्रंथाचे नुकतेच लातूर येथे राष्ट्रीय परिषदेत प्रकाशन झाले.

याप्रसंगी माजी कुलगुरू मधुकर गायकवाड, प्रा. पी. टी. पवार, प्राचार्य डॉ. दीपक बच्चेवार, डॉ. संतराम मुंडे, डॉ. एम. आय. शेख, प्रा. कोनेरू दुमलवाड, डॉ. पल्लवी काब्दे आदी उपस्थित होते. संदर्भ ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर ऊनग्रतवार, राजकुमार महाजन, विलास तोटावार, देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, गंगाधरराव जोशी, रवींद्र द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे आदींनी कतुरवार यांचे अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner